महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे  Rs.2/-  कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖ ०१ एप्रिल २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २७३ ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मेट्रोला बदलापुरपर्यंत हिरवा कंदील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर: सुमारे दशकभरापासून चर्चेत असलेल्या कांजूर मार्ग ते बदलापूर या मेट्रो मार्गाला एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पात तत्वतः मंजुरी मिळाली आहे त्यामुळे आता या मेट्रो मार्गाच्या उभारणीला वेग येण्याची विल्हे दिसत आहेत. राज्य सरकारने ही बदलापूरकरांना दिलेली गुढीपाडव्याची भेट असल्याची भावता आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केली असुन मुख्यमंत्री व उपमुख्यमंड्यांचे आभार मावले आहेत.

मेट्रो १४ हा कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो मार्ग ३७.८ किमि लांबीचा आहे, या मार्गावर १५ स्थानके असणार असून त्यासाठी सुमारे १४ हजार ८९८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. बदलापूरातुन दररोज हजारो चाकरमानी मुंबईला प्रवास करीत असतात त्यांची बदलापूरपर्यंत मेट्रो यावी, अशी मागणी होती. त्यानुसार आमदार किसन कथोरे यांनी तत्कालिन मुख्यमकी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दहा वर्षापूर्वी याबाबत मानगी केली होती. वेस्टर्न मार्गावर जाणे सोयीचे व्हावे यासाठी बदलापूर कांजूरमार्ग मेट्रो मार्गाची मागणी आमदार किसन कथोरे यांनी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मेट्रो मार्गाला मंजुरी देण्याची तयारी केली होती. परंतु त्याच काळात निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने हा विषय प्रलंबित राहिला. त्यानंतरच्या दहा वर्षात याबाबत कोणतीही. कार्यवाही झाली नाही. मात्र अलीकडेच बदलापुरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्यावेळी आपल्या प्रलंबित असलेल्या मेट्रोच्या मागणीवर कार्यवाही करण्याची विनंती आमदार किसन कथोरे यांनी केली. त्यावर तातडीने या प्रकल्पाला दिशा दिली जाईल. लवकरात लवकर हे काम मार्गी लावले जाईल, असे आधासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार त्यांनी त्याच आठवड्यात मेट्रो मार्गाच्या भूसंपादनाबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानंतर आता उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी या मेट्रो मार्गाला एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पात तत्वतः मंजुरी दिली आहे. तातडीने हे काम सुरू करण्याचे आदेशाही त्यांनी दिले आहेत. त्यामुळें या कामाला आता वेग येणार असल्याचे किसन कथोरे यांनी सांगीतले. राज्य सरकारने बदलापूरकरांना दिलेली ही मेट्रोची गुढीपाडवा भेट असल्याचे सांगून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे बदलापूरकरांच्या वतीने आभार मानले आहेत.

## एकाच शाळेतील ४ विद्यार्थी पात्र

### नवोदय विदयालय परिक्षेत अस्नोली शाळेची छाप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : ग्रामीण भागातील गुणवान विद्यार्थ्यांना सीबीएसईच्या धर्तीवर गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी दरवर्षी केंद्रीय जवाहर नवोदय समिती मार्फत इयत्ता सहावी व इयत्ता नववीसाठी निवड चाचणी घेण्यात येते. नुकतेच निवड चाचणीचा निकाल संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून पहिल्या निवड यादीमध्ये ठाणे जिल्ह्यातून २३ विद्यार्थ्यांपैकी पैकी शहापूर तालुक्यातील २१ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये जिल्हा परिषदेच्या अस्नोली शाळेच्या तब्बल चार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यातील बहुसंख्य विद्यार्थी आदिवासी प्रवर्गातील आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जातो. या विद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून दरवर्षी जवळपास दहा हजार विद्यार्थी परीक्षा देतात. नवोदय विद्यालयासाठी इयत्ता सहावी साठी शहरी भागातून २५ टक्के तर ग्रामीण भागातून ७५ टक्के विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

अस्नोली शाळेच्या दिव्या राजेश देसले, दर्शना दिलीप बांगारे, गौरांगी उमेश घोडविंदे, चैतन्या बाळाराम म्हसकर या विद्यार्थ्यांचे इयत्ता सहावीमध्ये जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड झाली आहे. अतिशय स्पर्धात्मक अशा परीक्षेची वर्षभर तयारी करून उज्वल यश संपादन केल्यामुळे वर्गशिक्षक पुरुषोत्तम ठाकरे मुख्याध्यापक विजय पाटील, सहशिक्षक राजेंद्र सापळे,नवनित फर्डे,गणेश हरड, बाळू भेके यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे तसेच गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण यांनी विशेष कौतुक केले आहे.

### या आठवड्यात ठरणार

## भाजपाचा नवा अध्यक्ष



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. भाजपचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष याच आठवड्यात ठरण्याची शक्यता आहे. पक्षाच्या स्थापना दिनाआधी भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष जाहीर करण्यावर भाजपचा भर असल्याची माहिती समोर आली आहे. संघटनात्मक नाव नोंदणी पूर्ण झाल्याने अध्यक्षांचं नाव आता जाहीर होणार आहे.



भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी कोणा-कोणाच्या नावाची चर्चा होत आहे त्यांची नावं देखील समोर आली आहेत. भाजप अध्यक्षपदासाठी भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान, विनोद तावडे, डी पुरंदरेश्वरी यांची नावं आघाडीवर असल्याची



माहिती सुत्रांनी दिली आहे. आता यामधील भाजपच्या अध्यक्षपदी कुणाच्या नावाची वर्णी लागणार हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. भाजपच्या नव्या अध्यक्षाबाबत सर्वांना उत्सुकता लागली आहे. भाजपच्या नव्या अध्यक्षांच्या निवडीमध्ये

**महाराष्ट्रातील नेत्यासह ४ जणांच्या नावाची चर्चा**

प्रादेशिक संतुलन, महिला नेतृत्व, दलित प्रतिनिधीत्व आणि संघटन कौशल्य या मुद्द्यांना प्राधान्य दिलं जाणार आहे. बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि गुजरातसह अनेक राज्यांमध्ये काही दिवसातच निवडणूक होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजप राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## उल्हासनदी प्रदूषणाच्या विळख्यात

### जलपर्णीमुळे जलचर धोक्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : मनसेच्या गुडीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांनी देशातील नद्या प्रदूषणावरुन सरकारवर हल्ला चढवला, यावेळी महाराष्ट्रातील नद्यांचे वाढते प्रदूषण किती गंभीर आहे हे 'लाव रे तो विडिओ, च्या माध्यमातून सर्वासमोर मांडले, याप्रसंगी महाराष्ट्रातील ५५नदीपट्टे प्रदूषित असल्याचे सांगून सर्वात टॉपवर कल्याण तालुक्यातील उल्हासनदी असल्याचे सांगितले, सध्या या नदीचे पात्र जलपर्णीने ने व्यापले गेले असून यामुळे यातील मासे व इतर जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. तर पशु पक्षी, शेळया, मेंढ्या, बक-या, गायी म्हैशी यांची पाण्यासाठी भटकंती सुरू झाली आहे. कंभमेळयातील गंगा नदी प्रदूषण सध्या महाराष्ट्रात गाजत वाजत आहे. हा आपला मुद्दा टिकेनंतरही मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लावून धरला, काल झालेल्या शिवाजी पार्क वरील गुडीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांनी देशातील नद्या प्रदूषणावरुन सरकार वर हल्ला चढवला, देशात ३१ १नदी पट्टे प्रदूषित असल्याचे सांगून यामध्ये महाराष्ट्रातील५५नदीपट्टे सर्वाधिक प्रदूषित झाले आहेत. यात सर्वात टॉपवर ठाणे जिल्ह्यातील'उल्हासनदी, असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या उल्हासनदीचे पात्र जलपर्णीने व्यापले आहे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे मोहने आणि मोहिली येथील १०० एम एल डि क्षमतेने जलशुद्धीकरण केंद्र,एमआयडीसी चे म्हारळ जवळील राँ वाँटर केंद्र हेही या जलपर्णीने घेरलेले आहे, शिवाय अनेक ग्रामपंचायतीचे जलस्त्रोत, विहिरी, जलाशय, जलपर्णी मय झाले आहेत, यामुळे मासे, व इतर जलचर, यांना जलपर्णी मुळे ऑक्सिजन न मिळाल्याने त्यांचे जीवन धोकादायक बनले आहे, तर कडक उन्हात बकरी, शेळया मेंढ्या, गायी म्हैस यांना पाण्यासाठी जिते जलपर्णीने नाही अश्या ठिकाणी भटकंती करावी लागत आहे. एकूणच उल्हास नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात दूषित होत असून यावर वेळीच उपाययोजना न केल्यास मानवी जीवन देखील धोक्यात यायला वेळ लागणार नाही. केवळ आश्वासने देऊन हा प्रश्न सुटणार नाही




## राज ठाकरेंचा पाडवा मेळाव्यात हल्लाबोल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आज मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर मनसेचा भव्य गुढीपाडवा मेळावा पार पडला. या मेळाव्यामध्ये बोलताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून जोरदार फटकेबाजी केली. तर सध्या सुरू असलेल्या औरंगजेबच्या कबरीच्या वादावरून त्यांनी चांगलंच सुनावलं. सत्ताधाऱ्यांचे कान टोचले आहेत. यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी चित्रपटाने जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत, असा टोला देखील लगावलं आहे. आज मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्याला हजारो मनसैनिक उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, औरंगजेबाची कबर हटवायची, आताचा हा विषय कुठून आलाय? चित्रपटामुळे जागे होणारे हिंदू काही कामाचे नसल्याची टीका त्यांनी केलीय. चित्रपट उतरला की मग हे उतरले. विकी कौश मेल्यानंतर अन् अक्षय खन्ना औरंगजेब बनल्यानंतर तुम्हाला औरंगजेब कळला का? असा देखील सवाल त्यांनी भरसभेत केलाय.

व्हॉट्स ॲपवर इतिहास वाचता येत नाही. तुम्हाला इतिहास वाचण्यासाठी पुस्तकं वाचावी लागतील. औरंगजेबावर कुणीही बोलत आहेत. विधानसभेत बोलत आहेत. गुजरातमधला औरंगजेबाचा जन्म आहे. याबद्दल माहिती आहे का? इतिहासातून डोकं फिरवायला आहेच. ब्राह्मणांनी, मराठ्यांनी औरंगजेबाला साथ दिली, असं सांगितलं जातंय. हे सगळं माथी भडकवण्यासाठी केलं जात असल्याचा आरोप राज ठाकरेंनी केलाय. कोणता इतिहास सांगतो आहोत? असा प्रश्न देखील यावेळी त्यांनी उपस्थित केलाय. इतिहासांच्या पानामध्ये गेलात तर अपेक्षांची भांडी ठळाठळ फुटतील, असं देखील राज ठाकरे यांनी म्हटलंय.

मनसे नेते राज ठाकरे यांनी गुढी पाडवा मेळाव्यात सभेला संबोधित करताना विविध विषयांनार हात घातला. छावा चित्रपटानंतर निर्माण झालेल्या वादावर राज ठाकरेंनी जाहिरपणे अतिशय कडवट भूमिका मांडली आहे. यावेळी परिस्थितीनुसार कशा पद्धतीने निर्णय घेतले जातात, त्याची दाखले देखील राज ठाकरे यांनी दिलेत. राजकीय पक्ष जातीपातीत अडकवत असल्याचा आरोप राज ठाकरेंनी केलाय.

## ठाणे जिल्ह्यातील नव वर्ष स्वागत यात्रेत

## जिल्हा परिषदेच्या चित्ररथास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: श्री. कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास, ठाणे यांच्या वतीने आयोजित नव वर्ष स्वागत यात्रेत आज, रविवारी दि. 30 मार्च, 2025 रोजी पहिल्यांदा जिल्हा परिषद, ठाणे मार्फत चित्ररथ सादरीकरण करून सहभाग नोंदवला गेला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने या स्वागत यात्रेत ठाणे जिल्हा परिषदेच्या विविध योजनांची माहिती सादर करणारा चित्ररथ तयार करण्यात आला होता. नागरिकांनी या चित्ररथास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.




**५०% अनुदानावर संकरीत गायींचे / म्हशीचे वाटप, अनु.जाति/अनु.जमाती/दारिद्र्य रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजुरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना/बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, गरोदर स्तनदा मातांना अतिरिक्त आहार अंतर्गत (बाळंतविडा), कुपोषित मुलांना / गरोदर स्तनदा मातांना विशेष आहार, उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती, प्रधानमंत्री आवाज योजना-ग्रामीण अशा विविध योजनाबद्दल सविस्तर माहिती चित्ररथातुन देण्यात आली.**

या यात्रेचे 25 वे वर्ष असल्यामुळे 'संस्कृतीचा महाकुंभ' यंदाच्या यात्रेत पाहण्यास मिळाले असून विविध संस्था, महाविद्यालये तसेच शाळांसह जिल्हा परिषदेचा सहभाग होता. 50% अनुदानावर संकरीत गायींचे / म्हशीचे वाटप, अनु.जाति/अनु. जमाती/दारिद्रय रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजुरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना/बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, गरोदर स्तनदा मातांना अतिरिक्त आहार अंतर्गत (बाळंतविडा), कुपोषित मुलांना / गरोदर स्तनदा मातांना विशेष आहार, उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती, प्रधानमंत्री आवाज योजना-ग्रामीण अशा विविध योजनाबद्दल सविस्तर माहिती चित्ररथातुन देण्यात आली.

स्वागत यात्रा श्री. कौपिनेश्वर मंदिर - रंगो बापूजी गुप्ते चौक जांभळी नाका - दगडी शाळा - श्री गजानन महाराज चौक - तिन पेट्रोल पंप - हरिनिवास सर्कल - नौपाडा पोलिस स्टेशन - टेलिफोन एक्सचेंज चौक - गोखले रोड - स्वीट कॉर्नर - राम मारुती रोड - पू ना गाडगीळ ज्वेलर्स - तलावपाळी - उजवीकडे वळून पुन्हा कौपिनेश्वर मंदिर या मार्गे चित्ररथावरील योजनाचे सादरीकरण चलचित्रामार्फत (व्हिडीओ) करण्यात आले. नागरिकांना जिल्हा परिषदेच्या विविध योजनांची माहिती व्हावी, या उद्देशाने चित्ररथ तयार करण्यात आले होते.

कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास, ठाणे यांच्या वतीने आयोजित नव वर्ष स्वागत यात्रेत जिल्हा परिषदेत नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी जिल्हा परिषदेचा सहभाग महत्त्वाचा होता. नागरिकांनी देखील उत्तम प्रतिसाद दिल्याने जिल्ह्यात चित्ररथाची चर्चा सर्वत्र सुरू आहे, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

यावेळी जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या चित्ररथास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# गीतासार



**अध्याय ६**
**आत्मसंयमयोगः**

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता । योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ ६-१९ ॥

ज्याप्रमाणे वारा नसलेल्या जागी दिव्याची ज्योत हलत नाही, तीच उपमा परमात्म्याच्या ध्यानात मग्न झालेल्या योग्याच्या जिंकलेल्या चित्ताला दिली गेली आहे. ॥ ६-१९ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया । यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ ६-२० ॥

योगाच्या अभ्यासाने नियमन केलेले चित्त ज्या स्थितीत शांत होते आणि ज्या स्थितीत परमात्म्याच्या ध्यानाने शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने परमात्म्याचा साक्षात्कार होऊन सच्चिदानंदघन परमात्म्यातच संतुष्ट राहाते ॥ ६-२० ॥

सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् । वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ ६-२१ ॥

इंद्रियातीत, केवळ शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने ग्रहण करता येणारा जो अनंत आनंद आहे, तो ज्या अवस्थेत अनुभवाला येतो आणि ज्या अवस्थेत असलेला हा योगी परमात्म्याच्या स्वरूपापासून मुळीच विचलित होत नाही ॥ ६-२१ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः । यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ ६-२२ ॥

परमात्मप्राप्तिरूप जो लाभ झाल्यामुळे त्याहून अधिक दुसरा कोणताही लाभ तो मानीत नाही; आणि परमात्मप्राप्तिरूप ज्या अवस्थेत असलेला योगी फार मोठ्या दुःखानेही विचलित होत नाही ॥ ६-२२ ॥

# डॉ.आनंदीबाई जोशींना केडीएमसीतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : *डॉ.आनंदीबाई गोपाळ जोशी* यांच्या जयंती दिनानिमित्त आज कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात महापालिकेचे शिक्षणाधिकारी विजय सरकटे आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे यांनी डॉ.आनंदीबाई गोपाळ जोशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील डॉ.आनंदीबाई गोपाळ जोशी यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

# खाजगी कंपनीने खोदलेल्या रस्त्याकडे महापालिकेचे दुर्लक्ष



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
_कल्याण : रिलायन्स या खाजगी कंपनीने आपली केबल वाहिनी टाकण्यासाठी ड प्रभाग अंतर्गत असलेल्या तिसगांव नाक्यावर गेल्या दिड महिन्यापूर्वी भला मोठा खड्डा खोदून ठेवला होता. या खड्डयामुळे या ठिकाणी झालेल्या रस्त्याच्या दुर्दशेमुळे नागरीकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

ड प्रभाग अंतर्गत असलेल्या तिसगांव नाका या नेहमी गजबजलेल्या ठिकाणी रिलायन्स या खाजगी कंपनीने आपले केबल्स भुअंतर्गत जोडण्यासाठी एक चेंबर बनवला आहे. हा चेंबर बनविण्यासाठी खोदकाम करून टाकलेल्या मातीच्या ढिगाऱ्याने तसेच सदर ठिकाणचे पेव्हर ब्लॉक्सही उखडले गेल्याने या ठिकाणी सातत्याने दलदलीचे साम्राज्य पसरले आहे. या दुरावस्तमुळे वाहन चालक तसेच नागरीकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

प्राप्त माहिती नुसार कल्याण डोंबिवली महापालिकेने रिलायन्स कंपनीला भूअंतर्गत केबलचे जाळे टाकण्याची परवानगी दिली आहे, परंतु कंपनीकडून या दुरुस्तीच्या बदल्यात ६ पट रक्कम अगाऊ वसुल केली आहे. हे दुरुस्तीचे काम पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केले जाते . परंतु तिसगांव नाक्यावरील या प्रकारा प्रमाणेच शहरातील अनेक ठिकाणी दुरुस्ती न झालेल्या रस्त्याच्या दुर्दशकडे संबंधीत अधिकारी सोईस्करपणे दुर्लक्ष करत असल्याने अशा प्रकारांमुळे नागरीकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. फूल ( fool ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फूल करण्याचा आनंद आपण सगळयांनीच लुटला असेल. एप्रिल फूल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख ( fool ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये



# एप्रिल फूल

एप्रिल फूल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फूल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फूल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फूल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फूल

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फूल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फूल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फूल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फूल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फूल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिल फूल करावे. मोठेपणाला एप्रिल फूल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिल फूल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

# पत्रकाराला मारहाण गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण ग्रामीण भागातील पत्रकाराला समाजकंटकांनी ( ता. २८) शुक्रवारी भर चौकात मारहाण करण्यात आली होती. शिळफाटा चौकातील पत्रकाराला मारहाणीचा सीसीटीव्ही समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला आहे. शिळ गावातील राहुल काटे आणि जितू आलिमकर यांनी फावड्याच्या दांडकाच्या सहाय्याने पत्रकार विनोद वास्कर यांना मारहाण केली आहे. शीळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या प्रकारानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींनी ठाणे पोलीस आयुक्त डॉ. आशुतोष डुंबरे यांच्याकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे. मात्र शिळ डायघर पोलीस ठाण्यात आरोपींवर कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

# पडघा येथे शोभायात्रेला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पडघा : हिन्दु नववर्षाचे स्वागतासाठी निघालेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शोभायात्रेला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी श्री रामाच्या प्रतिकृतीची रथातुन मिरवणूक काढण्यात आली होती.

हिन्दु नववर्षाचे स्वागत करण्यासाठी रविवारी गुढीपाडव्याचे औचित्य साधून हिन्दु सांस्कृतिक मंच पडघे यांच्या वतीने अष्टगंध बॅण्ड पथक टिटवाळा यांच्या सुरेल तालावर फटाक्यांच्या आतेषबाजीत राम मंदीर ते संपुर्ण पडघे गावातुन शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वेशभूषा केलेल्या श्रीरामाच्या प्रतीकृतीची सजवलेल्या रथातुन मिरवणूक काढण्यात आली होती



तर पारंपारिक वेशभूषेत नागरीक, महीला, तरुण सहभागी झाले होते. तसेच नागरीकांनी आपल्या घरासमोर सुबक रांगोळ्या काढल्या होत्या तर शोभायात्रा ज्या रस्त्यावरून जात होती तिथे थंडपेय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नागरीकांकडुन करण्यात आली होती.तसेच शोभायात्रेत निंबवली येथील एका पथकाने शिवकालीन दांडपट्टा, लाठी, काठी, प्रात्यक्षिके सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.तर या शोभायात्रेत मंडळाचे आंनद कुमार गुप्ता यांनी श्री रामाची योग्य भुमीका सादर करुन सर्वाचेंच लक्ष वेधले होते. यावेळी मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर सरपंच रविंद्र विशे, मनसे माजी जिल्हाध्यक्ष शैलैश बिडवी, माजी सरपंच शंशाक तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य मयुरेश गंधे, नितीन म्हात्रे शोभायात्रेत सहभागी झाले होते. सदर शोभायात्रेची सांगता राम मंदीर येथे करण्यात आली. यावेळी शोभायात्रेत सहभागी झालेल्यांसाठी शितपेय, अल्पोपाहार, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. ही शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी हिन्दु सांस्कृतिक मंचच्या सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

# खरबूजाची शिकरण



उन्हाळाच्या दिवस सुरु झाले की बाजारात भरपूर खरबूज दिसू लागतात. अनेकदा त्याच्या वासामुळे लोक ते कापून खाणे पसंत करत नाहीत तर अनेकदा खरबूज फिकट निघतं ज्यामुळे त्याला चव येत नाही. परंतु आरोग्यासाठी हे खूप फायदेशीर आहे आणि म्हणूनच खरबूजाचे शिकरण करून सेवन केल्याने ते फारच चवदार लागते. हे शिक्रण एखाद्या गोड पदार्थांपेक्षा कमी नाही. हे चपतीसोबत देखील खाता येते नाहीतर नुसतं देखील चविष्ट लागतं. विशेष म्हणेज यासाठी फार काही साहित्य देखील लागतं नाही अशात हे घरी पटकन तयार होतं आणि उन्हाळ्यात थंडगार डिश खाल्ल्याने तृप्त वाटतं. तर चला जाणून घेऊया शिकरण कशा प्रकारे तयार करावे.

साहित्य-
1 खरबूज, अर्धा वाटी साखर, 1 लहान चमचा वेलचीपूड, ड्रायफ्रूट्स आवडीप्रमाणे

कृती-
खरबूचाला किसून घ्यायचे. त्यात साखर, वेलचीपूड आणि ड्रायफ्रूट्स मिसळून घ्यायचे. साखर विरघळेपर्यंत हालवत राहयचे. गार करण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवावे. हवं तेव्हा काढून सर्व्ह करावे.

# कल्याण पूर्वेत विविध संस्था संघटनांचा हिंदू नव वर्ष स्वागत यात्रेत सहभाग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी रविवारी सकाळी कल्याण पूर्वेत हिंदु नववर्ष स्वागत यात्रा समितीच्या विद्यमाने भव्य स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या स्वागत यात्रेत विविध संस्था संघनांचे प्रतिनिधी यांचे सह नागरीकांनीही उत्सुर्तपणे सहभाग घेतला होता . या यात्रे सहभागी झालेल्या शाळांपैकी सम्राट आशोक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सादरीकरणाने प्रथम क्रमांकाचे पारितोषीक पटकावले. द्वितीय क्रमांक गणेश विद्या मंदीर तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मातोश्री विद्यालयाला देण्यात आले .

हिंदू नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी अर्थात चैत्र शुध्द १, शके १९४७ या हिंदू नव वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेल्या या भव्य हिंदु नववर्ष स्वागत यात्रेचा प्रारंभ कल्याण पूर्वेतील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडा पटांगणाजवळील साई बाबांच्या मंदीरासमोर










आमदार सुलभा गायकवाड यांच्याहस्ते गुढी उभारून या नव वर्ष स्वागत यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. ही स्वागत यात्रा गणपती चौक, मुख्य बाजार पेठ, जुनी जनता सहकारी बँक, म्हसोबा चौक, तिसगांव नाका या मार्गातून पुढे जाऊन या स्वागत यात्रेचा समारोप तिसाई मंदीराच्या प्रांगणात करण्यात आला.

या स्वागत यात्रेत भारतीय संस्कृती, आणि परंपरा दर्शवीणारे काही चित्र रथ, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या संस्था संघटनांच्या प्रतिनिधींसह पारंपारिक वाद्ये, ढोल ताशे, लेझीम पथक, पालखी, विविध प्रकारची भारतीय कला गुण दर्शविणारी पथके सहभागी झाल्याने शोभा यात्रेला मोठ्या उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले होते. या यात्रेत सहभागी असलेल्या सम्राट अशोक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैविद्य पूर्ण गुढीने समाज प्रबोधनात्मक करून नागरीकांचे या गुढी कडे लक्ष वेधून घेतले होते.

या स्वागत यात्रेत भाजपा कल्याण जिल्हा उपाअध्यक्ष अभिमन्यू गायकवाड, कल्याण पूर्व भाजपा अध्यक्ष संजय मोरे, माजी नगरसेवक मनोज राय, शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे, विधानसभा प्रमुख प्रशांत काळे, माजी नगरसेविका माधुरी काळे, उद्योगपती अमित सोनवणे, संजय गायकवाड, भगवान भोईर, दत्ता गायकवाड, शाम शेळके, रवी हराळे, केतन रोकडे, ए.सी.पी कल्याणजी घेटे, वरिष्ठ पोलिस निरिक्षक गणेश नहयादे आदी मान्यवर सहभागी झाले होते.

तिसाई मंदीराच्या प्रांगणात संपन्न झालेल्या स्वागत यात्रा समारोपात स्वागत यात्रेसाठी योगदान देणारे मान्यवर तसेच यात्रेत सहभागी झालेल्या शाळा, संस्था, संघटनांचा आयोजकांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विष्णू जाधव यांनी केले तर उपस्थितांचे आभार संदिप तांबे यांनी मानले.

# ‘आश्रय द ग्रेट कपोक ट्री’ थीमवर लिटल आर्यन्सचे स्नेहसंमेलन साजरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण पूर्व लिटिल आर्यन्स प्री-के ने सावित्रीबाई फुले सभागृह, डोंबिवली येथे “आश्रय – द ग्रेट कपोक ट्री” या आकर्षक थीमसह आपला बहुप्रतिक्षित वार्षिक स्नेहसंमेलन दिवस साजरा केला. सर्जनशीलता आणि मौलिकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमात अँपरसँड ग्रुप संचालक डॉ. रीता सोनवत, प्रा. डॉ. दिनेश गुप्ता, लिटल आर्यन ग्रुप सीईओ मनहरलाल ठक्कर, आर्यग्लोबल स्कूल ग्रुप संस्थापक भरत मलिक उपस्थित होते.लिटल आर्यन्सचा वार्षिक दिवस हा पुस्तक-आधारित आहे. सर्जनशीलतेसह शिक्षणाचे मिश्रण आहे. यावर्षी, शाळेने लिन चेरीची "द ग्रेट कपोक ट्री" ही प्रेरणादायी कथा निवडली, जी निसर्गाच्या रक्षणाचे महत्त्व सुंदरपणे सांगते. पर्यावरण चेतनेला



चालना देणारी हरित शाळा म्हणून, या चालत्या कथेद्वारे मुलांमध्ये पर्यावरणाविषयी सहानुभूती आणि प्रेम निर्माण करण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता. लिटिल आर्यन्सचा वार्षिक दिवस खरोखरच उल्लेखनीय बनला तो म्हणजे 100% सहभागासाठीची वचनबद्धता, प्रत्येक मूल केंद्रस्थानी पोहोचेल याची खात्री करते. संगीत सादरीकरण पूर्णपणे स्वतःचे होते, सर्व गाणी इन-हाउस रचलेली होती आणि मुलांनी स्वतः गायली होती. त्यांच्या मधुर स्वरांनी प्रेक्षागृह आनंदाने आणि अभिमानाने भरून गेले आणि प्रेक्षकांना त्यांच्या प्रतिभेचा विस्मयच झाला. नृत्यांचे नृत्यदिग्दर्शन शिक्षकांनी केले. उपस्थितांना संबोधित करताना डॉ. रीता सोनवत यांनी शाळेच्या सर्वांगीण कार्यपद्धतीचे कौतुक केले. "लिटल आर्यनने वार्षिक दिवसाच्या थीममध्ये पर्यावरण शिक्षण विणून खऱ्या अर्थाने मुलांमध्ये निसर्गाबाबत आवड निर्माण करण्यात आली. मुलांनी अशा उत्कटतेने आणि मौलिकतेने सादर केलेले पाहणे आनंददायक होते." प्रा.डॉ. दिनेश गुप्ता यांनी सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी शाळेच्या प्रयत्नांची प्रशंसा केली, "लहान मुले आत्मविश्वासाने अशा अर्थपूर्ण कामगिरीचे सादरीकरण करतात हे पाहणे हे चांगल्या व्यक्तींचे पालनपोषण करण्याच्या शाळेच्या समर्पणाचा पुरावा आहे." कार्यक्रमाची सांगता भारत मलिक यांच्या हार्दिक संदेशाने झाली, ज्यांनी मुलांच्या एकजुटीच्या प्रयत्नांचे कौतुक केले. "लिटल आर्यांचा वार्षिक स्नेहसंमेलन दिवस उत्सवापेक्षा अधिक आहे - हा एक शिकण्याचा अनुभव आहे जो मुलांसोबत राहतो. त्यांची मौलिकता आणि निसर्गाशी बांधिलकी प्रेरणादायी आहे." सर्व उपस्थितांवर कायमचा ठसा उमटवून हा कार्यक्रम जबरदस्त यशस्वी झाला. मूळ संगीत, पुस्तक-आधारित थीम आणि इको-कॉन्शियस व्हॅल्यूजवर लक्ष केंद्रित करून, लिटल आर्यन्सने बालपणीच्या शिक्षणात ते वेगळे का आहे हे पुन्हा एकदा दाखवून दिले..



# ‘गुढीपाडवा-शाळा प्रवेश वाढवा’

## केडीएमसी शिक्षण विभागाच्या अभिनव उपक्रमास उत्तम प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाखाली, शिक्षण शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी महापालिका शाळांचा संपूर्णतः कायापालट करण्यासाठी पुढाकार घेतला असून त्यानुसार शाळा दुरुस्ती आणि प्रामुख्याने शाळांची पटसंख्या वाढविणे या बाबींचा अंतर्भाव आहे.



शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी बालवाड्यांचे बळकटीकरण करणे आणि महापालिका शाळा सर्व सुविधा युक्त तसेच दर्जेदार करणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे, त्याअनुषंगाने गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर महापालिकेच्या विविध शाळांमध्ये तब्बल ४०३ मुलांनी शाळा प्रवेश घेतला. महापालिकेच्या कल्याण पश्चिमेतील उंबर्डे तसेच डोंबिवलीतील पाथर्ली येथील शाळेमध्ये महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांचे हस्ते शाळेत नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची पटनोंदणी उत्साहात करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून अधिकाधिक शाळाबाह्य मुलांच्या शाळा प्रवेशासाठी शिक्षण विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत, शाळांसाठी मोठ्या प्रमाणात निधीही दिला असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिली. यावेळी सजग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या प्रयत्नातून शाळेने उभारलेल्या अत्याधुनिक अशा संगणक कक्षाचे व सुसज्ज प्रयोग शाळेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी माजी पालिका सदस्य जयवंत भोईर, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील इतर मान्यवर शिक्षण विभागाच्या कार्यक्रम अधिकारी अर्चना जाधव, उप अभियंता गजानन पाटील, भाजपा पदाधिकारी शत्रुघ्न भोईर, शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# कल्याण रेल्वे स्थानकाचा पाणीपुरवठा स्थगित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कल्याण रेल्वे स्थानकाला केला जाणारा पाणी पुरवठा १२ तासांहून अधिक काळासाठी खंडित केला. कल्याण रेल्वे स्थानकाकडून पाणीपट्टीचे तब्बल ४ कोटी ४१ लाख थकवल्याबद्दल महापालिकेकडून ही कारवाई करण्यात आली. रेल्वेने यातले १ कोटी रुपये भरण्याची तयारी दाखवल्यावर पाणी पुरवठा सुरळीत करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला. कल्याण रेल्वे स्थानकासह, रेल्वेच्या विविध आस्थापनांना मिळून कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेने ११ अधिकृत नळ जोडण्या पुरवल्या आहेत. यात आंबिवली, टिटवाळा येथील रेल्वे आस्थापनांचाही समावेश आहे. या सर्व ११ अधिकृत नळ जोडण्यांचे पाणी देयक गेल्या अनेक महिन्यांपासून थकले आहे. ही थकबाकी ८ कोटींहून अधिक असल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. या कारवाईमुळे कल्याण रेल्वे स्थानकातले पाणी बराच काळासाठी थांबले असल्याने रेल्वे स्थानकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. याबद्दल केडीएमसीच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, फक्त कल्याण रेल्वे स्थानक परिसरातीलच रेल्वेच्या आस्थापनांचे ४ कोटी ४१ लाख थकवल्याबद्दल ही कारवाई आहे. यात शनिवारी कल्याण रेल्वे स्थानकाला पाणी पुरवठा करणारे पाण्याचे दोन वॉल्व्ह बंद करण्यात आले. मात्र, त्यानंतर मध्ये रेल्वेच्या विभागीय व्यवस्थपकांनी सरकारकडे पाठपुरावा करून १ कोटी भरण्याची तयारी दर्शविली. तसेच, उर्वरित सर्व रक्कम कशी भरायची याबद्दल महापालिका आणि रेल्वे यांच्यात एक बैठक पार पडेल. त्यानंतर त्याबद्दलचा निर्णय होईल. त्यामुळे आज रेल्वेचा पाणी पुरवठा सुरळीत केला जाणार आहे.

# केडीएमसीच्या पाथर्ली शाळेत सौरऊर्जा यंत्रणेचा शुभारंभ



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर लोकसहभागातून कल्याण डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली पूर्व येथील पाथर्ली शाळा क्रमांक 62 मध्ये सौरऊर्जा यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या कामाचा शुभारंभ महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्याहस्ते आज करण्यात आला. पाथर्ली येथील शाळा क्रमांक 62 ही महापालिकेची कल्याण डोंबिवलीतील पहिली सोलर शाळा म्हणून आता ओळखली जाणार असून महापालिकेच्या उर्वरित शाळांमध्ये देखील माहे मे पूर्वी लोकसहभागातून सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित केली जाणार असल्याची असल्याची माहिती महापालिका आयुक्त आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी दिली.

आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी महापालिका शाळांचा संपूर्णतः कायापालट करण्यास प्रारंभ केला असून महापालिकेच्या शाळांमध्ये देखील आता सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित केल्याने विजेची पूर्णपणे बचत होणार आहे. या कार्यक्रमाच्या वेळी या सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यासाठी अर्थसाहाय्य करणारे रीजन्सी निर्माण ग्रुपचे विकासक अनिल भतीजा, अत्यंत कमी वेळात ही यंत्रणा बसविणारे कॉस्मो इंटरप्राईजेस त्याचप्रमाणे यासाठी विशेष परिश्रम घेणारे महापालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत, उपअभियंता जितेंद्र शिंदे आणि पर्यवेक्षक संदीप गिरी यांचा महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी महापालिकेचे उपायुक्त संजय जाधव, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, महापालिकेचे स्वच्छ भारत अभियानाचे ब्रँड अँबेसिडर डॉ प्रशांत पाटील, माजी पालिका सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# कल्याण पश्चिमेत हिंदू नववर्ष स्वागत यात्रा उत्साहात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण संस्कृती मंच आणि इनरव्हील क्लब ऑफ कल्याण आयोजित हिंदू नववर्ष स्वागतयात्रा २०२५ मोठ्या दिमाखात संपन्न झाली. यंदाच्या स्वागतयात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच महिला विशेष संघटनेकडे यजमानपद देण्यात आले होते. इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा डॉ अर्चना सोमाणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे शिवधनुष्य समर्थपणे पेलले. यजमानपद स्विकारल्यावर वर्षभर आपली संस्कृती जपणारे विविध कार्यक्रम व उपक्रम करत स्वागतयात्रेचे 'गौरव परंपरेचा, उत्सव संस्कृतीचा' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवले.







आयुक्त बंगल्यापासून सुरू झालेल्या शोभायात्रेत ढोल-ताशा, लेझीम सह सुमारे ६० चित्ररथ सहभागी झाले होते. शोभायात्रेच्या संपूर्ण मार्गावर कल्याणकर बहुसंख्येने उत्साहाने नववर्षाच्या स्वागतासाठी उपस्थित होते. केडीएमसी आयुक्त डॉ इंदू राणी जाखड, खासदार सुरेश म्हात्रे, माजी आमदार नरेंद्र पवार आदी मान्यवर देखील यात्रेत सहभागी झाले होते. संपूर्ण परिसर आनंदाने आणि उत्साहाने ओसंडून वाहत होता. या वर्षी असंख्य संस्था स्वतःहून स्वागतयात्रेचे स्वागत करत होत्या.

नमस्कार मंडळ येथे यात्रेची सांगता होत असताना सर्व सहभागी संस्थांचे आयोजकां तर्फे सत्कार करण्यात आले. इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा डॉ. अर्चना सोमाणी, सचिव ॲड. नीता कदम, प्रकल्प प्रमुख ॲड. अर्चना सबनीस, सहप्रमुख मीनाक्षी देवकर व सर्व महिला सदस्या यांनी कल्याण संस्कृती मंचचे अध्यक्ष डॉ. सुश्रुत वैद्य, सल्लागार ॲड. निशिकांत बुधकर व इतर सर्व पदाधिकारी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पत्रकार, स्वागतयात्रा प्रायोजक, विविध प्रकारे मदत करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था, तसेच स्वागतयात्रेत प्रचंड उत्साहाने सहभागी होऊन ही स्वागतयात्रा नेत्रदीपक करणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार मानले.

# ओव्या दिनांच्या सिंदखेडराजा येथे प्रकाशित



कवी कथाकार सुधीर शेरे यांचा साहित्य वेल प्रकाशन, सातारा यांनी प्रकाशित केलेला 'ओव्या दिनांच्या' या कवितासंग्रहाचे दि. 31 मार्च रोजी बहुजन साहित्य संघ, चिखली. आयोजित सहावे बहुजन साहित संमेलन सिंदखेडराजा या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. या प्रसंगी संमेलनाध्यक्ष प्राचार्य बी. एन. चापे, किरण डोंगरदिवे, सिनेअभिनेत्री डॉ. रेणू जोशी,संपादक डी.एन. जाधव, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, डॉ. विजयकुमार कस्तुरे, डॉ. डी. व्ही.खरात, संपादक ज्ञानेश्वर बुधवत आदी मान्यवर उपस्थित होतो. स्थानिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय, जागतिक दिन विशेषांवर अधारित अष्टकक्षरी छंदातील ओव्या संस्था, विद्यार्थी, शिक्षक, पालक,यांना प्रबोधनपर कविता ज्ञान, विज्ञान, कला, सेवा, आरोग्य, प्रदुषण, पर्यावरण, आदी विषयांवर मूल्य रुजवण करणा-या कवितासंग्रहाचे सर्वांनी स्वागत करुन शुभेच्छा दिल्या.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# रक्तदान हे जीवनदान देणारे श्रेष्ठदान

## भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख साईनाथ तारे यांचे प्रतिपादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - रक्तदान हे जीवनदान देणारे श्रेष्ठदान असून कधी कधी पैसा असूनही ठराविक ग्रुपचे रक्त न मिळाल्याने माणूस हताश होतो असे प्रतिपादन भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख साईनाथ तारे यांनी येथे केले .

कल्याण पश्चिम येथील महापालिकेसमोरील स्वामी नारायण हॉल येथे आपलं प्रतिष्ठान ह्या संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनी आदरांजली देण्यासाठी रक्तदान शिबिर तसेच सुशिक्षित बेरोजगार नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते . त्याप्रसंगी साईनाथ तारे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. शिबिराचे उद्घाटन १०४ वेळा रक्तदान केलेले सुरेश जोशी यांच्या हस्ते करण्यात आले . याप्रसंगी व्यासपीठावर सर्वश्री अनिल काकडे, विनायक शेणवी, सुरेश रेवणकर , कुमुदिनी देसाई, शकुंतला राय, नयना नायर, वीणा निमकर , अरुणा कदम, सोनल लोहार उपस्थित होते .



यावेळी साईनाथ तारे पुढे म्हणाले कि माणूस प्रसंगी पैसा कुठूनही गोळा करू शकतो मात्र गरज असेल आपल्याला हव्या त्या रक्ताच्या ग्रुपचे रक्त मिळवू शकत नाही . अशावेळी तो पैसा असूनही हताश होतो. म्हणून ज्या ज्या संस्था रक्तदान शिबिर राबवितात त्यांचे कौतुक केले पाहिजे . रक्तदान शिबिर असा उल्लेख करत असतांना रक्तदानाच्या पुढे कंसात जीवनदान असा शद्ध टाकून पुढे शिबिर असे म्हटले पाहिजे असे आपले मत देखिल साईनाथ तारे यांनी यावेळी व्यक्त केले .

रक्तदान शिबिरात नयना नायर आणि त्यांच्या मुलीने रक्तदान करून समाजासमोर आदर्श ठेवला . ६५ वर्ष पूर्ण झाल्याने रक्तदान करण्याची इच्छा असूनही रक्तदान करता येत नसल्याबद्दल खेद व्यक्त करत शकुंतला राय ह्या ज्येष्ठ महिला कार्यकर्तीने आपली नात आणि जावई यांना रक्तदान करण्यास प्रोत्साहन दिले . ॲड. अनिकेत सांगळे यांनी रक्तदान करून वकिल, सारिका मांगले यांनी रक्तदान करून शिक्षक तर रश्मी घुले यांनी रक्तदान करून कलाकार देखिल सामाजिक बांधिलकी जपतात हे दाखवून दिले.

# बोगस डॉक्टरांवर उल्हासनगर महापालिकेची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगरमध्ये वैद्यकीय व्यवसायाच्या मुखवट्याआड चालणाऱ्या एका भयंकर वास्तवाचा उलगडा झाला आहे. बोगस डिग्री, बनावट परवाने आणि परराज्यातून आलेले 'डॉक्टर' शहरात निर्धास्तपणे क्लिनिक चालवत होते. या धक्कादायक खुलाशानंतर उल्हासनगर महापालिकेने तत्काळ कारवाई करत या बोगस डॉक्टरांचा पर्दाफाश करत त्यांची यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या डॉक्टरांपैकी सर्वाधिक परराज्यातील असून, त्यांच्या चुकीच्या उपचारामुळे अनेक रुग्णांचे जीव धोक्यात आले होते. 'डॉक्टर' या विश्वासाच्या शब्दाला काळीमा फासणाऱ्या बोगस डॉक्टरांविरोधात उल्हासनगर महापालिकेने मोठी कारवाई केली आहे. ठाणे जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने विशेष तपासणी करत तब्बल २६ डॉक्टरांची संशयित यादी तयार केली. या तपासणीतून समोर आलेली सर्वात गंभीर बाब म्हणजे, गुन्हा दाखल करण्यात आलेल्या १८ बोगस डॉक्टरांपैकी बहुतांश डॉक्टर परराज्यातील आहेत. त्यांनी कोणतीही वैध वैद्यकीय पात्रता नसतानाही उल्हासनगरमध्ये क्लिनिक उभारून नागरिकांवर उपचार केल्याचे उघड झाले आहे. महापालिका आयुक्त



तथा प्रशासक मनीषा आव्हाळे यांनी या बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा आणि त्यांच्या पथकाने तातडीने तपासणी केली आणि संबंधित डॉक्टरांविरोधात पोलीस विभागात गुन्हे दाखल करण्यात आले. सजग राहा, फसवणूक टाळा महानगरपालिकेचे आवाहन महापालिकेच्या वतीने नागरिकांना स्पष्ट सूचना देण्यात आली आहे की, अवैध डॉक्टरांकडून उपचार घेऊ नयेत. संशयास्पद क्लिनिकबाबत प्रशासनाला तत्काळ कळवावे. वैध व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनी आपली नोंदणी व परवाने अद्ययावत ठेवावेत.

# नवेगाव येथील भजन स्पर्धेत श्रोत्यांनी दिली भरभरून दाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : साडेतीन मुहूर्तापैकी एक असणाऱ्या गुढीपाडवा या सणाचे औचित्य साधून हिंदू नववर्षानिमित्त पेण तालुक्यातील नवेगाव येथे श्री सत्यनारायण मंदिराचा ४२ वा वर्धापन दिन व पुजेनिमित्त भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आये होते.परिसरातील नागरिकांनी या भजनाचा मनमुराद आनंद लुटला.

उत्तम आवाज, गायन कला, पेहराव, गायनाची लय व नागरिकांचा प्रतिसाद पाहता या स्पर्धेत एकूण १० भजन मंडळ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत कानिफनाथ संगीत भजन मंडळ डोलवी यांना प्रथम क्रमांक म्हणून ७७७७ रुपये व चषक देण्यात आले.तर दत्त प्रासादीक भजन मंडळ बेणेघाट (द्वितीय) ५५५५ रुपये व चषक बापदेव संगीत भजन मंडळ दिवलांग (तृतीय ) यांना ३३३३ रूपये व चषक तर चतुर्थ क्रमांक काळबादेवी संगीत भजन मंडळ गडब यांना २२२२ रूपये व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले . यावेळी परिक्षक म्हणून पंडित रघुनाथ फडके, व गुरुनाथ घरत यांनी काम पाहिले स्पर्धेत उत्कृष्ट गायक म्हणून धीरज ठाकूर उत्कृष्ट मृदुंग वादक सानिका म्हात्रे, उत्कृष्ट गणवेश म्हणून भजन मंडळ कणे यांना सन्मानित करण्यात आले.

# वणव्यामुळे जंगलाची राख

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील पाडाळे, मांडवत, पह्रे, खेडले, तळवली, दळवी पाडा बांदलपाडा ,ठुणे येथील जवळपास अडीच हेक्टरच्या वनविभागाच्या जंगलात वणवा लागला या वनव्यामध्ये जंगलाची राख झाली आहे ही घटना रविवारी रात्री दहा वाजता घडली आहे त्याचबरोबर या जंगलात सरपटणारे हजारो प्राणी मृत्युमुखी पडले आहेत याबाबत सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मुरबाडे यांनी तात्काळ वन खात्याशी संपर्क साधला परंतु नेटवर्क प्रॉब्लेम व काही तांत्रिक अडचणीमुळे फोन लागत नव्हते परंतु उशिरा दहा वाजता वनविभाग टोकावडे अधिकारी यांना



कळविण्यात आले की आपल्या जंगलाला वनवा लागला आहे परंतु रात्री साडे अकरा वाजेपर्यंत एकही कर्मचारी उपस्थित नव्हता त्यामुळे जंगल संपत्ती व वन्यजीव यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मुरबाडे यांनी दिली आहे. परंतु दरवर्षी हजारो हेक्टरच्या जंगलाला वनवा लागला जातो यावर वन खात्याने वरिष्ठ पातळीवरून कायमस्वरूपी यावर काय उपयोजना करता येईल याकडे वन खात्याने पहाणे अत्यंत गरजेचे आहे अशी माहिती येथील उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी दिली आहे. त्यानंतर उशिरा का होईना पावणे बारा वाजता टोकावडे वर खात्याचे दोन वनरक्षक कर्मचारी शामराव कसबे. (वनरक्षक मिल्हे. ) एम. एफ. पावरा. वनरक्षक धसई आले त्यांनी वनवा विझवण्यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले त्यामुळे या दोन कर्मचाऱ्यांच्या सतर्क कामगिरीमुळे आग आटोक्यात आली गेली.





# श्री साई गणेश मंडळाच्या पालखीचे शिर्डीकडे जल्लोषात प्रस्थान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा-: मांडा-टिटवाळ्यातील श्री साई गणेश मंडळाच्या वतीने आयोजित वार्षिक पदयात्रा व पालखी सोहळ्याला आज उत्साहात सुरुवात झाली. आज सकाळी ८ वाजता सावरकरनगर येथून अजिंक्य शिवसेना शाखेजवळून मोठ्या जाल्लोशपूर्ण वातावरणात साई पालखीचे प्रस्थान झाले. संपूर्ण परिसर साईनामच्या गजराने दुमदुमला होता . याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी साईपालखीत पायी चालत पालखीला खांदा दिला . या पालखीचे परिसरात ठिकठिकाणी रांगोळ्या काढून स्वागत करण्यात येत होते. आज निघालेली ही पालखी ६ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र टिटवाळा येथे साईबाबांच्या दर्शनाने पूर्ण होणार आहे. यात्रेदरम्यान साईभक्त, भाविक आणि समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. या पवित्र यात्रेचा समारोप १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता साई भंडारा व महाप्रसादाने होणार आहे.

श्री साई गणेश मंडळाचे अध्यक्ष किशोर शुक्ला यांनी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. भाविकांच्या अखंड हरिनामसंकिर्तनाच्या गजरात निघालेल्या या पालखी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

### एकवीरा आई ऐतिहासिक पुराव्यांसहीत माहितीसाठी

# ‘इतिहास संशोधन मंडळ’ स्थापन करा

## युवासाहित्यिक सर्वेश तरे यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एकवीरा आई ऐतिहासिक पुराव्यांसहीत माहितीसाठी ‘इतिहास संशोधन मंडळ’ स्थापन करण्याची मागणी युवासाहित्यिक सर्वेश तरे यांनी केली असून खासदार आणि एकवीरा देवस्थानाचे प्रमुख विश्वस्त सुरेश म्हात्रे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात १६९२ च्या दरम्यान मन्सुरखान बेग नावाच्या सरदाराला औरंगजेबाने एकविरा देवीच्या मंदीरावर हल्ला करायला पाठवले. हिंदवी स्वराज्यातील लोहगड किल्ला मुघल सरदार मन्सूरखान बेग याने दग्याने जिंकून घेतला आणि तो जवळच असलेल्या एकविरा मंदिरावर विध्वंस करण्याचा प्रयत्नात होता. याच दरम्यान सप्तसहस्त्री नावजी बलकवडे यांच्या स्वप्नात आई एकविरा देवी येऊन दृष्टांत दिल्याचे म्हटले जाते आणि त्यानेच प्रेरीत होऊन नावजी बलकवडे यांनी पवन मावळातील आपले सहकारी विठोजी कारके यांच्या मदतीने इ.स. १६९२ च्या भर पावसात मन्सूर बेग वर अचानक हल्ला करून प्राणाची बाजी लावून औरंगजेबाचा एकविरा मंदिर उध्वस्त करण्याचा प्रयत्न उधळवून लावला.

त्याच सप्तसहस्त्री नावजी बलकवडे यांचे वंशज इतिहास संशोधक पुरातत्ववेत्ते पांडूरंग बलकवडे यांनी सर्वेश तरे हे शिष्ट मंडळासहित पुण्यात गेले असता भारतीय पुरातन इतिहास संशोधक मंडळात सांगीतले, अन यासंदर्भात पुरातन इतिहास संशोधक मंडळात २०० हून अधिक शिवकालीन दस्तऐवज असल्याचे आवर्जून सांगीतले. एकविरा आईचा हा जाज्वल्य इतिहास ऐतिहासिक पुराव्यांसोबत जगासमोर यावा यासाठी आई एकवीरा मंदीर देवस्थानामार्फत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना व्हावी अशी विनंती युवासाहित्यिक सर्वेश तरे यांनी देवस्थानांचे अध्यक्ष,सर्व सदस्य आणि खास करुन मतदार भिवंडी लोकसभेचे खासदार सोबत देवस्थानाचे विशेष विश्वस्त सुरेश म्हात्रे यांना समाज माध्यमात विडीओ मार्फत आवाहन केले.

ती विडीओ समाज माध्यमांवर वायरल झाली,या विडीओस सर्व एकवीरा आई भक्तांनी उंदड प्रतिसाद दिला. याच अनुषंगाने टिटवाळा येथील सामाजिक कार्यकर्ते शनी आंबरे यांनी खासदार सुरेश म्हात्रे यांची भेट घेऊन आई एकवीरा देवस्थानाच्या वतीने इतिहास संशोधन मंडळ स्थापन करावे अशी विनंती केली अन त्यास खासदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत येत्या तीन-चार दिवसात आई एकविरा पालखी जत्रे निमीत्त होणाऱ्या बैठकीत हा विषय घेण्याचे आश्वासन शनी आंबरे यांना दिले .



खासदार आणि एकवीरा देवस्थानाचे प्रमुख विश्वस्त सुरेश म्हात्रे यांचा सकारात्मक प्रतिसाद

# ‘स्वरगंध महाराष्ट्रा’चा ने उभारली रसिकांना तृप्त करणारी गुढी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्वरगंगेच्या काठावरती, शुक्रतारा मंदवारा, वारा गायी गाणे, धुंदी कळ्यांना, मल्हारवारी मोतीयानं द्यावी भरुन, अहो मला लागली कुणाची उचकी, आला आला वारा, राणी माझ्या मळ्यामंदी घुसशील काय, जयोस्तुते श्री महन्मंगले... या आणि अशा एकाहुन एक अवीट श्रवणीय भावगीत, चित्रपट गीतांनी नवी मुंबईकरांचा गुढीपाडवा संस्मरणीय झाला. निमित्त होते वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहात पार पडलेल्या ‘स्वरगंध महाराष्ट्रा’चा या अभिजात संगीताचा आस्वाद देणाऱ्या वाद्यवृंदाचे.

प्रदीप नायर यांची संकल्पना व सुरज दास यांचे दिग्दर्शन तसेच विशाल सकपाळ यांच्या संगीत नियोजनाखाली सादर करण्यात आलेल्या या सुरेल कार्यक्रमातील गाण्यांनी श्रोत्यांना तीन तास वेगळ्या वातावरणात नेऊन ठेवले. डॉ. धनश्री सरदेशपांडे, मधुरा वालावलकर, आशा क्रिष्णा यांच्यासह मंदार जोशी, सुरेश बोभाटे व सुरज दास यांनी मराठी चित्रपटांतील गीते तसेच भावगीते अत्यंत सुरेख पध्दतीने सादर करुन रसिकांना तृप्त केले. या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या नेत्रा गुजराती आणि सहकारी तसेच अभिषेक यांचा सत्कार मध्यंतरात करण्यात आला.

याप्रसंगी लेखक पत्रकार राजेंद्र घरत आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, विविध नामांकित मराठी वाद्यवृंदांचे कार्यक्रम काळाच्या ओघात बंद पडले. अशा वेळी ‘स्वरगंध महाराष्ट्रा’चा या कार्यक्रमाने आम्हाला आकाशवाणी, दूरदर्शन व वाद्यवृंदांनी समृध्द केलेल्या गीतांच्या रम्य युगात नेले. साहित्य मंदिर सभागृहात मराठीतील नामांकित साहित्यिकांनी कार्यक्रम केल्याची स्मृती जागी करुन येथेच या वाद्यवृंदाचा कार्यक्रम साजरा होत असताना आम्हा साऱ्यांना साक्षीदार होता आले याचा आनंद व्यक्त करत घरत यांनी वादक, कलावंत यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी करुन प्रतिसाद दिला.

# अचानक बदललेल्या वेळापत्रकामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहण्याची भिती

## मुख्याध्यापक व शिक्षकांमध्ये चिंतेचे तर पालकांमध्ये संतापाचे वातावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्यातील सर्व माध्यमाच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाचवेळी घेण्याचे आदेश शिक्षण विभागाने काढले आहेत. त्यासाठी शिक्षण विभागाकडून थेट वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार 8 एप्रिलपासून विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होऊन ती 25 एप्रिलपर्यंत संपणार आहे. तसेच या परीक्षेचा निकाल महाराष्ट्र दिनी 1 मे रोजी लावण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. 2 मे पासून सर्व शाळांना उन्हाळी सुट्टी घोषित करण्यात आली आहे.

शिक्षण विभागाने ऐनवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता, कोणालाही विचारात न घेता परीक्षेच्या वेळापत्रकाचे आदेश काढल्याने शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांची सोडवणूक व्हावी म्हणून शिक्षक, मुख्याध्यापकांनी संबंधित संघटना, शिक्षक, पदवीधर आमदार, लोकप्रतिनिधी यांच्यापर्यंत आपल्या भावना व्यक्त केल्या व परिस्थितीची जाणीव करून दिली. शिक्षक संघटना, शिक्षक व पदविधर आमदार, लोकप्रतिनिधी यांनी या संदर्भातील पालक व शिक्षकांच्या अडचणी प्रशासन व शिक्षणमंत्री यांच्यापर्यंत मांडण्याण्याचा जोरदार प्रयत्न केला परंतु या प्रयत्नांना यश आले नाही.

विद्यार्थी हिताच्या दृष्टीने शासनाने घेतलेला निर्णय हा बरोबर आहे. परंतू हा निर्णय ऐन परीक्षेच्या कालावधीमध्ये घेणे चुकीचे आहे. हाच निर्णय परीक्षेच्या कालावधीपूर्वी चार ते पाच महिने अगोदर घेतला असता तर त्यानुसार शाळेने व पालकांनी नियोजनामध्ये बदल केले असते. शिक्षक १ मे पर्यंत शाळेत असणार आहेत. शासनाने दिलेले कामे कर्तव्य समजून शिक्षक पार पाडणार आहेत. परंतु विद्यार्थी आणि पालकांची यामध्ये गोची निर्माण झालेली आहे. परराज्यांमधून रोजी रोटी, रोजगार व व्यवसायासाठी आलेले अनेक कुटूंब महाराष्ट्रात वास्तव्य करत आहेत. गेली अनेक वर्षापासून दहा ते पंधरा एप्रिल पर्यंत वार्षिक परीक्षा संपत असतात. तसेच अनेक वर्ष हे कुटुंब गावी गेले नसतात त्यामुळे वर्षभरापूर्वीच आपल्या मूळ गावी असलेले कामाचे नियोजन करत असतात. वाढती लोकसंख्या पाहता तिकीट मिळत नाही म्हणून यावर्षी सुद्धा त्यांनी तीन ते चार महिने पूर्वीच आपल्या मूळ गावी जाण्यासाठी 11 ते 20 एप्रिल दरम्यान रेल्वेचे बुकिंग करून ठेवलेले आहेत. या रेल्वे मार्गावर अचानक ( तात्काळ )तिकीट काढून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालून प्रवास करणे असे आहे. तसेच ऐनवेळी दलाला मार्फत जास्तीचे पैसे मोजून तिकीट घ्यावे लागते.

मागील शैक्षणिक सत्रापर्यंत इ.8वी पर्यंत अनुत्तीर्ण न करण्याचे शासन निर्णयाळे शेवटची परीक्षा नाही दिली तरी वर्षभराच्या मूल्यमापनावरती विद्यार्थी पास होतात. अशी या पालकांची मानसिकता झालेली आहे.त्यामुळे परीक्षेचे गांभीर्य या पालकांना राहिलेले नाही.

> **इ.८ वी मध्ये मुलगी शिकत आहे. ५ मे रोजी माझे कुटुंबात लग्न असल्यामुळे मी फेब्रुवारी २०२५ मध्येच दि. २७ एप्रिल रोजी गावी जाण्याचे रेल्वेचे तिकीट बुकिंग केले आहे. अचानक दि. २५,२६,२७ एप्रिल रोजी गोरकपूर कडे जाणाऱ्या गाडया बंद झाल्या आहेत. माझ्या कुटुंबासह गावी जाणे गरजेचेच आहे. दि.१० एप्रिल पर्यंत परीक्षा संपल्या असत्या तर मी मिळेल त्या परिस्थितीमध्ये गावी जाण्याच्या माणसिकतेमध्ये आहे.परंतु विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि.२५ एप्रिल पर्यंत असल्याने काय करावे ते सुचेनासे असे झाले आहे.**
> **राजेंद्र प्रसाद पाल – पालक**

8 एप्रिल ते 25 एप्रिल 2025 रोजी पर्यंत होणाऱ्या परीक्षेमध्ये मुले अचानक पालकांसोबत जर गावी गेली तर त्यांच्या परीक्षा कधी घ्यायच्या. त्यांचे निकाल पत्रक कसे बनवायचे असे अनेक प्रश्न मुख्याध्यापक व शिक्षकांसमोर उभे राहिलेले आहेत. आपला मुलगा जर परीक्षेपासून वंचित राहिला तर तो अनुत्तीर्ण होणार का ? अनुत्तीर्ण झाला तर त्याचे वर्ष वाया जाईल एकीकडे मुलाचे शिक्षण आहे तर दुसरीकडे कुटुंब आहे अशा समस्या पालकांमध्ये निर्माण झाल्याने पालकांमध्ये संतापाचे वातवरण निर्माण झालेले आहे. मुख्याध्यापकांनी पालक सभा घेऊन नवीन वेळापत्रक व परीक्षेचे गांभीर्य पालकांना समजावून सांगितले आहे. या सर्वच समस्या समोर आसताना बदललेल्या वेळापत्रकामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार की काय अशी भीती शिक्षक मुख्याध्यापकांना वपालकांमध्ये निर्माण झालेली आहे. सध्या वेळ गेलेली नाही. त्यामुळे प्रशासनाने या वेळापत्रकाचा पालकांच्या कौटुंबिक समस्यांना समजून घेवून घेतलेल्या निर्णयाचा फेरबदल करण्याची अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे.

# मुरबाडमध्ये गुढी पाडव्याचा जल्लोष

## नववर्ष स्वागतयात्रेत मान्यवरांची मोठी गर्दी

### व्यसनमुक्ती देखाव्याने वेधले लक्ष! मुरबाड पोलिसांचे उत्कृष्ट सहकार्य!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : आज मुरबाड शहरात गुढी पाडव्याच्या मंगलमय दिनी नववर्षाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. सकाळी ८ वाजता श्रीराम मंदिरापासून निघालेल्या भव्य नववर्ष स्वागतयात्रेने शहरात चैतन्याची लाट आणली होती. पारंपरिक वेशभूषेत सज्ज नागरिक, ढोल-ताशांचा गजर आणि लेझीमच्या नृत्यामुळे मुरबाड शहर दिवसभर आनंदात न्हाऊन निघाले होते. नववर्ष स्वागत यात्रा समिती, मुरबाड यांच्या यशस्वी आयोजनाखाली पार पडलेल्या या यात्रेत समाजाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती होती. नगराध्यक्ष संतोषजी चौधरी यांनी या यात्रेचे नेतृत्व केले, तर माजी नगराध्यक्ष मोहन सासे आणि मुकेश विशे यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली. शहरातील विद्यमान नगरसेवक मोहन गडगे आणि नंदकुमार जाधव यांच्यासह माजी नगरसेवक नाना साबळे, संतोष चौधरी (माऊली), नरेश जाखोटिया, सागर चंबवणे, जुगल किशोर जाखोटिया यांनीही यात्रेत सक्रिय सहभाग घेतला. यात्रेमध्ये शिक्षण क्षेत्रातील मान्यवर हरेशजी पुरोहित आणि नितीन मोहपे सर, तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन चोणकर यांची उपस्थिती होती. नववर्ष स्वागत यात्रा समितीचे कार्यकर्ते कृष्णकांत मलिक सर, निलेश पिसाट, परेश पोवळे, सुनील कुंभार, ज्ञानेश्वर कथोरे, प्रकाश सोनावळे, किरीट पिसाट, त्रितेज दुगाडे, संतोष पुरोहित आणि प्रदीप बडगुजर यांनी या यात्रेच्या यशस्वीतेसाठी कठोर परिश्रम घेतले. या आनंददायी सोहळ्यात पत्रकार बंधू मुरलीधर दळवी, दिलीप पवार, बाळासाहेब भालेराव, प्रकाश जाधव , मंगल डोंगरे,चेतन पोतदार, सचिन पोतदार आणि शहरातील मोठ्या संख्येने महिला व नागरिकांनी सहभाग घेतला. या यात्रेतील खास आकर्षण ठरले ते प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय यांच्या तर्फे सादर करण्यात आलेला व्यसनमुक्तीचा प्रभावी देखावा. या सामाजिक संदेश देणाऱ्या कलाकृतीने उपस्थितांना विचार करण्यास प्रवृत्त केले. यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मुरबाड पोलीस स्टेशनने प्रशंसनीय सहकार्य केले, ज्यामुळे कोणताही अडथळा न येता हा कार्यक्रम शांततेत पार पडला. गुढी पाडव्याच्या या शुभदिनी मुरबाडमधील नागरिकांनी एकजूट दाखवत नवीन वर्षाचे उत्साहात स्वागत केले. नववर्ष स्वागत यात्रा समितीने या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.



* विशेष आकर्षण: पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशा, लेझीम, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रजापिता ब्रह्मकुमारी यांचा व्यसनमुक्ती देखावा

* सहकार्य: मुरबाड पोलीस स्टेशन

मुरबाड शहरात आज गुढी पाडव्याचा उत्साह आणि नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा झाला, ज्यात सामाजिक सलोखा आणि सहकार्याची भावना दिसून आली.

# गरजु बालकांना पादत्राणे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : समाजात अशी अनेक बालके आहेत ज्यांना गरीबीमुळे पायाला साधी चप्पलही मिळत नाही. पण जि प शाळा क्र ३ पारोळा शाळेच्या ४१ गरजु विद्यार्थ्यांची ही अडचण मुख्याध्यापक मनवंतराव साळुंखे यांनी सोशल मिडियावर मांडली. त्याची त्वरीत दखल घेत लोकेश फाऊंडेशन अध्यक्ष तथा संपादक साप्ता कलम प्रहार सुनिल महाजन व समाजसेवक विनोद जैस्वाल या मित्रांनी घेतली व शाळेच्या ४१ विदयार्थ्यांना छान सुंदर टिकावु अशी पादत्राणे उपलब्ध करून दिली.यावेळी दोन्ही दात्यांनी "आज गरजु विद्यार्थ्यांना पायाला काटा मोडु नये व उन्हाचा चटका लागु नये म्हणून पादत्राणे देतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे. अशा गरजु बालकांच्या मदतीसाठी समाजातील सक्षम घटकांनी पुढे यावे व यापुढेही आमची ही सेवा अशीच सुरु ठेवु असे प्रतिपादन केले. मुख्याध्यापक मनवंतराव साळुंखे यांनी सुत्रसंचलन तर अर्चना सेवलीकर यांनी आभार मानले.

### पेण तालुक्यात

# ग्रामपंचायत निवडणूकीचे बिगुल वाजणार ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जानेवारी 2024 ते डिसेंबर 2025 या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील 351 ग्रामपंचायतींच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम सुरु झाला आहे. प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. 26 मार्चपर्यंत प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या ग्रामपंचायतींचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे उन्हाळयात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींवर प्रशासक आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुका कधी होणार याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे. अखेर ही उत्कंठा संपण्याच्या मार्गावर आहे. मुदत संपणाऱ्या, मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्याने तसेच बहिष्कार व इतर कारणांमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत, अशा रायगड जिल्ह्यातील 240 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि 111 ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यानुसार मतदार याद्यांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध करणे, हरकती व सूचना दाखल करण्याचा कार्यक्रम 24 मार्चपर्यंत सुरु राहणार आहे. त्यानंतर 26 मार्चला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्वच प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असून मतदार यादी तयार करण्याच्या कामात व्यस्त झाले आहेत. एप्रिलअखेर ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविले असून मतदान मे मध्ये होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पेण तालुक्यातील एकूण 18 ग्रामपंचायतींचे निवडणूका असून यामध्ये गागोदे खुर्द, करंबेळी, कासू, अंतोरे, जावळी, पाबळ, वरेडी, बेणसे, शिहू, कुहिरे, झोतीरपाडा, वढाव, शिर्की, उंबर्डे, कांदळे, रावे, शेंडोशी, जिर्णे या ग्रामपंचायतीचा समावेश आहे. त्यामुळे पेण तालुक्यात उन्हाळयात राजकीय वातावरण तापणार आहे

# जी एस महानगर को ऑपरेटीव्ह बँकेच्या शाखांचे उद्घाटन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई - राज्यातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जी एस महानगर बँकेच्या पारनेर तालुक्यातील सुपा , पुणे येथील फुरसुंगी व साताऱ्यातील मलकापूर या ३ शाखांचे एटीएम सुविधेसहित मोठ्या उत्साहात उद्घाटन गुरुवार दि . २७ रोजी संपन्न झाले .

या ३ ही शाखांच्या उद्घाटन प्रसंगी बँकेच्या संचालक मंडळा सह सहकार , राजकीय , शैक्षणिक , कृषी, सामाजिक , पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर व प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होत्या .





या ३ नवीन शाखांमुळे जी एस महानगर बँकेच्या शाखांची संख्या ७० झाली आहे . बँकेने ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या पेक्षा जास्त केला असून गत २०२३ व २४ या आर्थिक वर्षात बँकेचा निव्वळ नफा ३० कोटी रुपये होता . तर त्याच बरोबर शेकडा शून्य टक्के नेट एनपीए चे उद्दिष्ट साध्य करण्यात बँक यशस्वी झाली आहे . रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या सर्व आर्थिक निकषांची बँकेने पुर्तता केल्यामुळे आर्थिक दृष्ट्या सक्षम वी सुव्यवस्थित बँकेचा दर्जा प्राप्त झाला आहे .

सर्वसामान्य माणसांच्या प्रगतीमध्ये सहकारी बँकांची भूमिका खूप मोलाची आहे व नजीकच्या भविष्यात बँकेच्या ग्राहकांना उत्तमोत्तम आणि अदयावत सेवा प्रदान करून ५ हजार कोटी रुपयांचा एकूण व्यवसाया चा टप्पा पार पाडण्याचा बँकेचा मानस आहे , असा विश्वास बँकेच्या अध्यक्षा श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केला . आतापर्यंत ची बँकेची प्रगती ही बँकेच्या सर्व भागधारक , ग्राहक , हितचिंतक आणि कर्मचारी वर्ग यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच शक्य झाले आहे , असे ही अध्यक्षा शेळके म्हणाल्या .





‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024